दिव्य मराठी
धाराशिव जिल्हा 27-08-2024

**सुरक्षा • छत्रपती कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी कार्यशाळा**

# युवकांमध्ये सायबर जागरूकता गरजेची: पांगे

प्रतिनिधी | उमरगा

श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सेक्युरिटी या संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी बोलताना सायबर तज्ञ प्रतिक्षा पांगे यांनी महाविद्यालयीन युवक आणि युवतींमध्ये सायबर जागरूकता गरजेची असल्याचे सांगितले.

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवी जीवन सुलभ झाले असले तरी त्यामुळे समस्या व अडचणींत वाढ सुद्धा मोठ्या प्रमाणात झाली आहे. बँकिंग फ्रॉड,सेक्स्टॉर्शन, मुली व महिलांना होणारा नाहक त्रास आदी बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्वीक हिल फौंडेशन व श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे संयुक्त विद्यमाने सायबर सिक्युरिटी विषयावर आयोजित कार्यशाळेत कु पांगे बोलत होत्या. प्रतिक्षा पांगे पुढे बोलताना स्नॅपचॅट, इंस्टाग्राम अशा ॲपवर नकळतपणे होणाऱ्या चुका आणि त्यामुळे होणारा मनस्ताप, बँकिंग फ्रॉड टाळण्यासाठी युक्त्या सांगितल्या. याबाबत त्यांनी काही उदाहरणेही दिली.



उमरगा : श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी कार्यशाळेत सायबर तज्ञ प्रतिक्षा पांगे यांचा सत्कार करण्यात आला.

## सायबर सिक्युरिटी शपथ

समाज माध्यमाचा कमी, योग्य व सुरक्षित वापर या संदर्भानेही मार्गदर्शन केले. सध्या वाढती सायबर गुन्हेगारी ही चिंतेती बाब आहे.सर्वात धक्कादायक म्हणजे सायबर गुन्हेगारांच्या टोळ्या आता विद्यार्थ्यांना जाळ्यात अडकवतायत.

त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्हेगारीबाबत जनजागृती होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे, असे सांगून उपस्थित सर्वांना सायबर सिक्युरिटी शपथ देण्यात आली. यावेळी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले व इतर उपस्थित होते.